# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 16/03/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :– दिनांक १८/११/२०१७ चे १४:०५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– आंनद अशोक श्रिवास्तव वय ४४ वर्ष रा. वार्ड क्र. १ खापरखेडा ता. सावनेर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप. क्र ४९५/२०१७ कलम ३०७, ५०४, ५०६, ३४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १७/११/२०१७ चे २०:०० ते २०:१५ वा. दरम्यान ग्रामपंचायत चिचोली उपसरपंच पदाचे निवडणूक असल्याने **जखमी नामे– कृष्णकुमार सुखलाल श्रीवास्तव वय ४० वर्ष रा. खापरखेडा** याने विरूध्द पार्टी कडून काम का केले या कारणावरून जुन्या वैमन्यातुन खुन्नस काढण्याकरीता आरोपी नामे– १) सागर कृष्णाराव माहुरकर, वय २६ वर्ष, रा. क्र. १ खापरखेडा ता. सावनेर २) सुनिल रामदास वाघधरे, वय ३२ वर्ष रा. चनकापुर खापरखेडा ता. सावनेर ३) अशोक रूपचंद मेश्राम वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र. २ खापरखेडा ता. सावनेर यांनी जखमी इसमास जेवण करण्याच्या बहाण्याने धापेवाडाकडे सोबत घेवून गेले. व तेथे आरोपीने साक्षीदार गाडी चालक नामे– राहुल बांगडकर यास त्याची गाडी सिगरेड पिण्यासाठी थांबविण्यास सांगुन गाडी थांबविली असता जखमी व आरोपी हे सिगरेड पिले व जखमी इसम गाडीत बसतांना आरोपीने जखमीच्या उजव्या बाजुच्या पसलीवर तसेच छातीवर चाकुने मारून गंभीर जखमी केले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली अशा जखमीचा पुतण्या/फिर्यादीच्या तोंडी व मेडीकल रिपोर्ट वरून गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि. गणेश पाल पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १६/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीला आरोपी क्र. ०१ यास कलम ३०७ भादवि. मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा झाली. व आरोपी क्र. २ व ३ यांच्याविरूदध आरोप सिदध न झाल्याने त्यांना निदोर्ष मुक्त करण्यात आले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/मधुकर आदमने पो.स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०९ किमी अंतरावर मौजा फेटरी गोदाम जवळ येथे दिनांक १४/०३/२०२३ चे २३.४५ वा दरम्यान नमुद आरोपी क्र १) मंगल जगदीश पांडे वय २८ वर्ष रा. चिखली एन.आय.टी. ७० कॉटर कळमना नागपूर ह. मु. सावळी खुर्द तह. कळमेश्वर व २) विजय उर्फ काल्या वल्द कंसराम उर्फ दिलीप निर्मलकर वय ३२ व ा रा. पारडी गिरजा नगर नागपूर ह. मु. चिखली एन.आय.टी. ७० कॉटर कळमना हे संगणमत करून त्यापैकी आरोपी क्र. १ हा आपले ताब्यातील एक लोखंडी पाते असलेला मोठा चाकु ज्याला स्टिल मुठ असलेली एका बाजुने धारदार पाते असलेला एका बाजुने नोकदार ज्याची मुठी पासुन ते टोकापर्यतची लांबी १९ इंच, टोकापासुन मुठी पर्यंतची लांबी १२.५ इंच लांब, मुठ ६.५ इंच लांब व ज्याची मुठ गोलाइ ५ इंच मध्यभागी चापट पात्याची रूंदी २.५ इंच असलेली, अशा प्रकारची जुना वापरता मोठा चाकु किंमती अंदाजे ५००/–रू ची भिरकावीत असतांना दिसुन आला तसेच त्याचे ताब्यात एक सिडी डीलक्स निळया रंगाची मोटरसायकल क्रमांक एम.एच ३१/जी ८२३६ ज्याचा इंजन क्र. व चेचीस क्रमांक हा खोडतोड केलेला असुंन किंमती अंदाजे २०,०००/–रू ची तसेच आरोपी क्र २ हा आपले हातामध्ये एक लोखंडी पाते असलेला मोठया कैचीचा पाता ज्याला लाकडी मुठ असलेला एका बाजुने धारदार पाते असलेला एका बाजुने नोकदार ज्याची मुठी पासुन ते टोकापर्यंतची लांबी २१ ईंच, टोकापासुन मुठी पर्यंतची लांबी १३ ईंच लांब, लाकडी मुठ ८ ईंच लांब व ज्याची मुठीची गोलाई ५ ईंच मध्यभागी चापट पात्याची रूंदी १ इंच असलेली अशा प्रकारची जुना वापरता मोठया कैचिचा पाता किंमती अंदाजे १००/–रू. ची ही भिरकावित हवेमध्ये फिरवीत असतांना मौजा फेटरी गोदामजवळ येथे हे बडबड करीत हातामध्ये वरील प्रमाणे धारधार शस्त्र घेवुन भिरकावित फिरत असतांना मिळुन आले तसेच त्यांचे ताब्यातुन वरील प्रमाणे मोटरसायकल मिळुन आली.

सदर प्रकरणी सरतर्फे स.फौ. मन्नान नौरंगाबादे ब नं १०४ पो स्टे कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. मन्नान नौरंगाबादे ब. नं १०४ पोस्टे कळमेश्वर हे करीत आहेत.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा खापरखेडा वार्ड क्रमांक दोन सोनार गल्ली येथे दिनांक १५/०३/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– **सौ शुभांगी नितेश गुरव वय 26 रा वार्ड कमांक दोन सोनार गल्ली खापरखेडा** मृतक ही आपले घरी कुलरची साफसफाई करीत असताना इलेक्ट्रिक करंट लागल्यामुळे तिला उपचाराकरिता न्यू लाइफ हॉस्पिटल खापरखेडा रोड दहेगाव रंगारी येथे घेऊन गेले. डॉक्टरांनी उपचारादरम्यान तपासुन मृतक ही मरण पावल्याचे घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितेश रमेशराव गुरव व ३४ वर्ष राहणार सोनार गल्ली वार्ड कमांक दोन खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मसपोनि. मलकुवार मो नं. ९६२३६८७६२७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर